# भारत सरकारच्या आरोग्य योजना

**अनुराधा बाळकृष्ण पवार,** संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रस्तावना :—**

१.३ अब्ज लोकसंख्येसह भारत हा जगातील सर्वात मोठा आणि सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. अलिकडच्या वर्षात लक्षणीय आर्थिक वाढ असूनही भारताला अजून ही असंख्य आरोग्यविषयक आव्हानांचा सामना करावा लागत आहे. ज्याचा परिणाम तेथील नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे.

भारत हे फार्मास्युटिकल आणि बायोटेक्नॉलॉजी उद्योगांचे केंद्र आहे. जागतिक दर्जाचे शास्त्रज्ञ, क्लिनिकल चाचण्या आणि रुग्णालये तरीही देशाला सार्वजनिक आरोग्याच्या आव्हानांना तोंड दयावे लागत आहे. जसे की बालकांचे कुपोषण, नवजात आणि माता मृत्युचे उच्च दर, असंसर्गजन्य रोगांमधील वाढ, रस्ते वाहतूक अपघातांचे उच्च दर आणि इतर आरोग्याशी संबंधित समस्या आहेत.

भारतातील लोकसंख्येचे आरोग्य सुधारण्यासाठी नागरिकांच्या हक्कांबद्दल जागरुकता वाढवणे अपेक्षित आहे. नागरिकांच्या सहभागाला आणि स्वावलंबनाला प्रोत्साहन देऊन एक व्यापक दृष्टीकोन विकसित करण्याची आवश्यकता आहे. भारताच्या लोकसंख्येच्या आरोग्यविषयक समस्यांकडे पाहिले तर असे दिसून येते कि ज्यामध्ये अनेक सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय घटक लोकांच्या एकूण आरोग्यावर परिणाम करताना दिसतात.

जगतिक बॅंकेने जो अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये औषधे व ऑपरेशनाच्या खर्चामुळे भारतात दर वर्षी ५ कोटी लोक गरिबीत ढकलले जातात. जगातील १९५ देशामध्ये आरोग्य निर्देशांकात भारत १४५ नंबरवर आहे. भारताचा आरोग्य सेवेवरचा एकूण खर्च एकूण रक्कमेच्या सव्वा टक्के आहे. भारतातील एकूण लोकसंख्येचा विचार केला तर १४ लाख डॉक्टरांची कमतरता असल्याचे जाणवते. भारतात ७००० लोकसंख्येमागे १ डॉक्टर अशी सद्यस्थिती आहे. अनेक लोकांकडे आरोग्य विमा नाही. ६७: लोक औषधे, मेडिकल बिलासाठी स्वत:च्या खिशातून पैसे खर्च करतात. ४: लोकांकडे आरोग्य विमा आहे पण तो ही खाजगी कंपनीकडून घेतला आहे. भारतातील केवळ २२: लोक सरकारच्या आरोग्य सेवेचा लाभ घेत आहेत.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम समतेचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने पुस्तके, वर्तमानपत्रे व इंटरनेटवर वेबसाईट इत्यादीचा उपयोग करण्यात आला.

**उद्दिष्टे :—**

१. भारत सरकारच्या आरोग्य योजनेच्या स्वरुपाविषयी माहिती करुन देणे.
२. स्त्रियांसाठी राबवल्या जाणाऱ्या आरोग्य योजनेच्या स्वरुपाविषयी माहिती करुन देणे.
३. सामाजिक व आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या नागरिकांना आरोग्य योजने विषयी माहिती देणे.
४. माता व बालक यांच्या आरोग्य सुरक्षा योजनेच्या उद्देशाविषयी माहिती करुन देणे.

**भारत सरकारच्या आरोग्य योजना :—**

**१ आयुष्यमान भारत योजना :—**

ही जगातील सर्वात मोठी आरोग्य योजना असून ती २३ सप्टेंबर २०१८ पासून सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा शुभारंभ ‘रांची’ (झारखंड) येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आला. देशातील १० कोटी पेक्षा जास्त कुटुंबांना म्हणजेच जवळ जवळ ५० कोटीपेक्षा जास्त लोकांना मोफत आरोग्य सेवा देणे हा या योजनेचा उद्देश आहे. एका कुटुंबाला एका वर्षासाठी ५ लाख रुपयांचा विमा संरक्षण खर्च देण्यात येणार आहे. हा खर्च केंद्र सरकार व राज्य सरकार दोघांमध्ये देण्यात येणार आहे.

**२ एकात्मिक महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना :—**

ही योजना २ जुलै २०१२ रोजी सुरु करण्यात आली. या योजनेचे पुर्वीचे नाव राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना असे होते. १ एप्रिल २०१७ पासून तिच्या नावांत बदल करण्यात आला. पिवळी शिधापत्रिका धारक (दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे व अंत्योदय योजनेचे लाभार्थी), बांधकाम कामगार, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबे यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. प्रतिवर्षी प्रति कुटुंब ५ लाख रुपये, मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ४ लाख रुपये एवढे विमा संरक्षण अनुदान मिळते.

**३ प्रधानमंत्री मातृवंदना योजना :—**

या योजनेचे पूर्वीचे नांव इंदिरा मातृत्व सहयोग योजना होते. ही योजना २०१० साली सुरु केली. २०१७ साली या योजनेचे नाव बदलून प्रधानमंत्री मातृवंदना योजना असे करण्यात आले. माता व

बालकांचे आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीने गर्भवती व स्तनदा मातेला सकस आहार घेण्यास प्रोत्साहीत करुन त्यांच्या आरोग्यात सुधारणा व्हावा व जन्मास येणाऱ्या नवजात बालकांचेही आरोग्य सुधारावे. माता मृत्यू व बाल मृत्यू दरात घट होऊन ती नियंत्रीत व्हावी यासाठी ही योजना सुरु करण्यात आली. आर्थिक सहाय्य ५००० रुपये तीन टप्प्यात देण्यात येते. पहिला टप्पा १००० रुपये, दुसरा टप्पा २००० रुपये व तिसरा टप्पा २००० रुपये असे देण्यात येते.

**४ बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना :—**

२२ जानेवारी २०१५ रोजी ही योजना सुरु करण्यात आली. पूर्वग्रह दुषित दृष्टीकोनामुळे होणाऱ्या लिंग निवडीला प्रतिबंद करणे, स्त्री भ्रुणहत्यांना प्रतिबंद करणे, मुलींच्या जिवीताची आणि संरक्षणाची खातरजमा करणे. हे या योजनेचे उद्देश होते.

**५ माहेर घर योजना :—**

आदिवासी आणि दुर्गम डोंगराळ भागातील गर्भवती महिलांसाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. संस्थात्मक बाळंतपणात वाढ होऊन आदिवासी भागातील माता व बाल मृत्यू कमी करणे. हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.

दुर्गम भागात अवघड रस्ते असल्याने बाळंतपणासाठी गर्भवतींना वेळेवर आरोग्य केंद्रामध्ये दाखल करणे जिकिरीचे बनते. त्यामुळे प्रसूतीच्या चार ते पाच दिवस आधी गर्भवतींना आरोग्य संस्थांमध्ये दाखल केले जाते. गर्भवती महिलेस बूडित मजुरी म्हणून प्रतिदिन २०० रुपये देण्यात येते. एकूण तीन दिवसाचे ६०० रुपये खात्यावर जमा होते.

**६ प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान :—**

केंद्रशासनाकडून या योजनेची सुरुवात २०१६ साली करण्यात आली. गरोदर महिलांना प्रत्येक महिन्याच्या ठराविक दिवशी आश्वासित आणि गुणवत्तापूर्ण प्रसूतीपूर्व सेवा मिळावी या उद्देशाने या अभियानांची सुरुवात केली. प्रयोगशाळेतील तपासणी, सोनोग्राफी तपासणी, प्रसूती तज्ञाकडून शारीरिक व उदर चिकित्सा, अति जोखमीच्या गरोदरपणाचे वेळेवर निदान या सेवा दर महिन्याच्या ९ तारखेला आरोग्य सुविधा केंद्रात लाभार्थ्यांना मोफत दिल्या जातात.

**७ सुमन योजना (सुरक्षित मातृत्व आश्वासन):—**

या योजनेची सुरुवात १० ऑक्टोबंर २०१९ रोजी करण्यात आली. देशातील मातामृत्यू व अर्भक मृत्यू यांचे प्रमाण शुन्यांवर आणणे हा या योजनेचा उद्देश होता. किमान चार प्रसूतीपूर्व तपासण्या, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानांतर्गत किमान एक तपासणी, फॉलिक ॲसिड गोळया, तपासणीसाठीचा प्रवास, इतर आवश्यक प्रसूतीपूर्व औषधे व नवजात अर्भकांच्या तपासणीसाठी सहा भेटी इत्यादी बाबी या योजनेतंर्गत पुरविल्या जातात.

**८ राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम :—**

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत शालेय आरोग्य कार्यक्रम राज्यात फेब्रुवारी २००८ पासून राबविण्यात येत होता. या कार्यक्रमात वय वर्ष ६ ते १८ वयोगटातील शहरी व ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येत होती. शालेय आरोग्य कार्यक्रमांच्या यशानंतर राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम केंद्र शासनामार्फत ६ फेब्रुवारी २०१३ पासून सुरु करण्यात आला.

**९ वंदे मातरम् योजना :—**

९ फेब्रुवारी २००४ रोजी या योजनेची सुरुवात झाली. मागासवर्गीय गर्भवती महिलांना व दारिद्रय रेषेखालील गर्भवती महिलांना आरोग्याची सुविधा उपलंब्ध करुन देणे, खाजगी आरोग्य यंत्रणेचा सहभाग वाढवणे हा या योजनेचा उद्देश आहे. गर्भारपणात लागणारी औषधे, खाजगी रुग्णांलयांना मोफत पुरविणे, जीवनसत्व अ लसी देणे इत्यादी सेवा पुरविल्या जातात. दर महिन्याची ९ तारीख वंदे मातरम् दिवस पाळण्यात येतो. कारण गर्भवती मातांच्या खाजगी तसेच शासकीय रुग्णालयांमधील बाहय रुग्ण तपासणी, सल्ला, मार्गदर्शन व कुंटुंब नियोजनाचे सल्ले देण्यासाठी हा दिवस ठरविण्यात आला आहे.

**१० बेबी केअर किट :—**

प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा शासकीय रुग्णांलयात नाव नोदणी केलेल्या व त्या ठिकाणी प्रसूती होणाऱ्या मातांना पहिल्या प्रसूतीच्या वेळी नवजात बालकांसाठी रुपये २००० रक्कमेपर्यंतच्या बेबी केअर किट उपलंब्ध करुन देण्यात येतात.

**निष्कर्ष :—**

१) भारताची लोकसंख्या १.३ अब्ज पेक्षा अधिक आहे. सामाजिक—आर्थिक विषमता आणि आरोग्यविषयक सेवांच्या मर्यादित पायाभूत सुविधांमुळे संसर्गजन्य रोगांपासून असंसर्गजन्य रोगापर्यंतच्या अधिक खालावलेल्या आरोग्यविषयक समस्यांशी भारत झुंजत आहे. शहरीकरण, औद्योगिकीकरण

आणि बदलती जीवन शैली यांसारख्या घटकांमुळे शारीरिक, मानसिक अशा दुहेरी रोगांचा भार वाढला आहे. विशेषत: ग्रामीण भागात कुपोषण आणि आरोग्य सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. यासाठी सरकारने जनतेला वाजवी दरात उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा विविध आरोग्य योजनांच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिल्या आहेत. यासाठी केंद्र सरकारने २०१३ मध्ये 'राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा' प्रारंभ केला.

२) सरकारने सुरु केलेल्या आरोग्य योजनेचा लाभ गरजू व गरीब लोकांना नक्कीच होत आहे. 'आयुष्यमान भारत योजना' (नॅशनल हेल्प प्रोटेक्शन मिशन २०१८) ही योजना जगातील सर्वात मोठी योजना आहे. ५०० दशलंक्षाहून जास्त लोकांना आर्थिक संरक्षण ही योजना देते. प्रत्येक कुटुंबाला प्रतिवर्षी ५ लाख रुपयापर्यंतचा आरोग्य विमा दिला जात आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे सुरु आहे. तर काही व्यक्तींना हा लाभ ही मिळाला आहे. माता व बालकमृत्यू दर ही २०१५—१६ मधील आकडेवारीच्या तुलनेत ५.५ टक्क्यांनी घटला आहे.

३) कुपोषण ही विशेषत: महिला आणि मुलांमध्ये आदळणारी भारतातील एक महत्त्वाची आरोग्य समस्या आहे. यासाठी पोषक आहार ही योजना सुरु केली आहे. अंगणवाडीमार्फत मुलांना सकस आहार दिला जातो. याचा फायदा कुपोषीत बालक व माता यांना मिळत आहे. कुपोषणाची समस्याही दूर होत असलेली पाहायला मिळते. गर्भवती महिलांना, विशेषत: आदिवासी महिलांना प्रसूती दरम्यान काही सवलती दिल्या जातात. लिंगनिदान करणे यावर बंदी असून भ्रुणहत्याबंदी केली आहे. अलिकडे लिंग निदान करणे आणि गर्भपात करणे याविषयी कठोर कायदे अंमलात आणले आहेत. मुलींची संख्या वाढवणे हा उद्देश आहे. सद्यस्थितीला मुलींच्या आरोग्यविषयी, भविष्यासाठी सरकारने अनेक योजना अंमलात आणल्या असून त्यांना सुरक्षित जीवन दिले आहे.

४) प्रधानमंत्री मातृवंदना योजनेद्वारे माता व बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी, तसेच माता व बालकमृत्यू दर कमी व्हावा यासाठी ५०००रुपये रक्कम तीन टप्प्यात लाभार्थी महिलांच्या खात्यावर जमा केली जाते. दारिद्र्य रेषेखालील व दारिद्र्य रेषेवरील सर्व पिवळी, केशरी शिधापत्रिका धारकांना एकात्मिक महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेद्वारे प्रतिवर्षी प्रति कुटुंब ५ लाख मिळाले आहेत. भारत सरकारच्या आरोग्य योजनेचा लाभ सर्व स्तरावरील लाभार्थ्यांना निश्चितच झाला आहे. नागरिकांच्या आरोग्यात सुधारणा झाली आहे. तसेच रोगांचे प्रमाण कमी होत आहे. माता बालकमृत्यू दर ही काही अंशी कमी झाल्याचे दिसून येते. नागरिकांना आरोग्याची सुरक्षित हमी दिल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचे समाधान पाहायला मिळते.

**समारोप :—**

भारत सरकारने राबवलेल्या आरोग्य योजनांचा लाभ दुर्बल व गरीब लोकांना होत आहे. दारिद्र्यरेषेखालील आर्थिकदृष्टया मागासलेल्या लोकांना या योजने व्दारे मोफत शस्त्रक्रिया व औषधे मिळाल्यामुळे त्यांचे आरोग्य सुधारले आहे. गर्भवती महिला यांना पुरविण्यात आलेल्या आरोग्य सेवेमुळे त्यांचे आरोग्य सुरक्षित झाले आहे. तसेच माता व बाल मृत्यूदर यांचे प्रमाणही कमी झाले आहे. कुपोषीत बालकांनाही सकस व पोषक आहार मिळत आहे. भारत सरकाच्या या आरोग्य योजनेचा लाभ समाजातील सर्वस्तरावरील लाभार्थ्यांना होण्यासाठी जनसंपर्क माध्यमाकडून माहिती देण्यासाठी आणखी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची :—**

१. वार्षिक अहवाल २०१९—२०२० महिला आणि बालविकास मंत्रालय (भारत सरकार)

२. प्रा. डॉ. अनिता खेडकर, प्राचार्य डॉ. राकेश चौधरी — महिला : आरोग्य संवर्धन, अथर्व पब्लिकेशन २०२२.

३. 'जागतिक आरोग्य दिन २०२४ : माझे आरोग्य, माझा हक्क' लेख:— मनुष्यबळ विकास मंत्रालय आणि आरोग्य मंत्रालय (भारत सरकार)

४. सागरकुमार विठ्ठल जाधव,(२०१८), 'सातारा जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची बिगरशासकीय संस्थामार्फत अंमलबजावणी : एक चिकित्सक अभ्यास (२००४ पासून), शोधनिंबध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.